# प्रकरण तीन

## सामान्य प्रशासन विभाग

### 3.1 ग्रामपंचायतीच्या रस्त्यावर सौर पथदिवे बसविण्याबाबत.

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5)** - पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेअंतर्गत सन 2011-2012 व 2012-2013 या वर्षात पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामपंचायत योजनेअंतर्गत पात्र 83 ग्रामपंचायतींना प्रत्येकी 3 सौरउर्जा पथदिवे बसविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.15/2013/, दिनांक 30/03/2013 अन्वये वॉर्डन सर्जिकल कंपनी प्रा.लि., पनवेल, नवी मुंबई या एजन्सीची नेमणूक झाली होती. सदर शासन निर्णयानुसार सौर पथदिव्यांची किंमत रक्कम रुपये 19,750/- एवढी निश्चित केली असून सदर किंमतीमध्ये राज्य हिस्सा रक्कम रुपये 9,600/- व केंद्र हिस्सा रक्कम रुपये 5,925/- व ग्रामपंचायत हिस्सा रक्कम रुपये 4,225/- एवढा होता. परंतु वित्त विभागाने अर्थसंकल्पीय तरतुद 20 टक्के कपात केल्याने पुरेसे अनुदान प्राप्त न झाल्याने सदर खरेदी सन 2013-14 मध्ये घेण्यात आली होती. त्यानुसार 22 ग्रामपंचायतीना एकूण 67 नग सौरपथदिवे बसविण्याकरीता एकूण रक्कम रुपये 6,43,200/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक ठाजिप्र/ग्रा.पं/योज-2/वाशि/2013/187, दिनांक 20/12/2013 नुसार सदर कंत्राटदाराला 22 ग्रामपंचायतींना एकूण 67 सौर पथदिवे पुरविण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर माल पाच आठवडे विलंबाने पुरवठा केल्यामुळे दंडाची रक्कम प्रती आठवडा 0.5 टक्के याप्रमाणे रक्कम रुपये 16,080/- दंडाची वसुली करणे आवश्यक आहे. (विलंबाने पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीच्या 0.5 टक्के प्रती आठवडा).

2) देयकातून सर्विस चार्जेस 12.5 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 80,400/- व व्हॅट 5 टक्के रक्कम रुपये 32,160/- असे एकूण वसूलपात्र रक्कम रुपये 4,040/- एवढी कपात होणे आवश्यक आहे.

### 3.2 सादील खरेदीतील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषदेने सादीलवार खरेदीसाठी रक्कम रुपये 1,40,967/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरच्या खरेदीबाबत निविदा प्रक्रिया राबविलेली नाही.

2) सक्षम अधिकारी यांनी पुरवठादाराला खरेदीचा पुरवठा आदेश दिलेला नाही.

3) खरेदी केलेल्या काही साहित्याची नोंद साठा नोंदवहीत केलेली नाही.

4) सन 2014-2015 च्या साठा नोंदवहीत सन 2011-2012 या वर्षात खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.

5) सदर खर्चाचा मंजूरी आदेश क्रमांक हा मंजूरी आदेशावर नमूद केलेला नाही.

6) सदरची खरेदी ही सांगली जिल्हा परिषद मुद्रणालय यांच्या कडून करण्यात आलेली नाही.

7) पुरवठादाराचे बील हे सन 2011-2012 या वर्षात प्रदान करणे आवश्यक असतांना ते बील सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्रदान करण्यात आलेले आहे.

### 3.3 15 टक्के मागासवर्गीय निधी खर्च करणेबाबत.

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषदेने रुपये 3,94,65,083/- इतकी रक्कम मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, आदेश क्र.ग्रा.पं.क्र./1089/418/34/21अ,दिनांक 14/09/1989 अन्वये मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी कमीत कमी 15 टक्के रक्कम ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या

स्वउत्पन्नातून खर्च करण्यासाठी आदेश दिलेले आहेत. जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी मार्च 2015 अखेर एकूण खर्च करावयाची रक्कम रुपये 4,04,18,569/- असतांना त्यापैकी रक्कम रुपये 3,94,65,083/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. रक्कम रुपये 9,53,486/- एवढ्या खर्चाचा अनुशेष शिल्लक आहे.

2) सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये त्या वर्षातील होणारी 15 टक्के रक्कम व सन 2014-2015 या चालू वर्षातील शिल्लक अनुशेष एकूण रक्कम रुपये 9,53,486/- प्राधान्यक्रमाने मागासवर्गीय उन्नतीसाठी शासनाच्या नियम व अटीनुसार खर्च होणे आवश्यक आहे.

## 3.4 13 वा वित्त आयोगाच्या अनुदानाच्या महाआनलाईनने पुरविलेल्या सेवा मनुष्यबळ मानधन प्रदानातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक तेरावा 2010/प्र.क्र.22/वित्त-4,दिनांक 30/08/2010 अन्वये सन 2010 ते 2015 या कालावधीसाठी 13 वा वित्त आयोगाच्या जनरल बेसीक ग्रॅन्ट, जनरल परफॉरसन्स ग्रॅन्ट, स्पेशल ऐरीया बेसीक ग्रॅन्ट व स्पेशल परफॅारसन्स ऐरीया ग्रॅन्ट च्या वितरणाबाबतचे निकष व राज्य स्तरावरुन पंचायत राज संस्थासाठी करावयाच्या बाबींचे नियोजन व पंचायत राज संस्थांनी पालन करावयाचे मार्गदर्शक तत्वाबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण यांचेकडील शासन निर्णय तेरावा 2015/प्र.क्र.18/वित्त-4,दिनांक 02/03/2015 मधील परिच्छेद 3 नुसार 13 वित्त आयोगांतर्गत महाऑनलाईन कंपनी मार्फत उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ मोबदला पोटी माहे ऑगष्ट 2014 ते जानेवारी 2015 एकूण 6 महिन्यासाठी रक्कम राखून ठेवण्यात यावी असे सुचित केले आहे.

वरील बाबींचे लेखापरिक्षण करीत असतांना प्रमाणक क्रमांक 33,दिनांक 12/09/2014 व 24/03/2015 रुपये 8,14,10,000/- व लेखाशिर्ष 2515-1953 तेरावा वित्त आयोग ग्रामपंचायतस्तर जनरल बेसीक ग्रॅन्ट मनुष्यबळ मोबदला देयकाची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे एप्रिल 2014 ते मार्च 2015 चे डाटाएंत्री आपॅरेटर मोबदला मानधन प्रती ऑपरेटर रुपये 8,000/- + कर इतकी आहरीत करुन महाऑनलाईन कंपनीस अदा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाऑनलाईन मुंबई यांचा जिल्हा परिषदेशी झालेला करार, कराराच्या अटी व शर्ती पुरवावयाच्या मनुष्यबळाच्या तांत्रिक अर्हतेबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

2) संगणक ऑपरेटरचे उपस्थितीचे दिवस तसेच त्यांचे हजेरीपट याबाबत अभिलेख आढळून आला नाही. महाऑनलाईनद्वारे सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज ऑनलाईन होत असतांना डाटाऑपरेटर्सचे हजेरीपट ऑनलाईन तयार करण्यात आलेले नाही. केवळ गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्यानुसार महाऑनलाईन कंपनीस प्रदान केलेले आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संग्राम 2012/प्र.क्र.147/ संग्राम कक्ष,दिनांक 16/01/2013 ई-पंचायत / संग्राम प्रकल्पाअंतर्गत प्राप्त झालेल्या 11 अज्ञावलींची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आलेली नाही. किंवा अंमलबजावणीची सुरवात केलेबाबतचा अभिलेख आढळून आलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक तेविआ 2011/प्र.क्र.42/वित्त-4,दिनांक 08/12/2015 मधील नमुद भारतीय आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 (जे) अन्वये 13 वा वित्त आयोगाच्या अनुदानातून महाऑनलाईनला प्रदान केलेल्या मोबदल्यातून महाऑनलाईनने पुरविलेल्या सेवा प्रित्यर्थ प्रती मनुष्यबळ मानधनातून सेवाकर 10 टक्के प्रमाणे कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष 2 टक्के प्रमाणे कपात केलेली आहे. तरी महाऑनलाईन कडून 8 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 38,51,094/- एवढी रक्कम वसूल करुन आयकर सदरी भरणा करावी.

5) व्यवसायकर कायदा 1975 मधील विवरणपत्र 1, सेक्शन क्रमांक 3 अन्वये 5823 * 175 = 10,19,025/- व्यवसायकर संबंधितांकडून वसूल केल्याची पडताळणी करावी अथवा महाऑनलाईनला माफ असल्याचे कागदपत्र उपलब्ध करावे.

उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र.4 प्रियासॉफ्ट प्रमाणे पंचायतराज स्तरावर म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतस्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या जमा खर्चाचे लेखे व इतर अनुषंगिक अहवाल उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे शासनाचे या बाबींवर केलेला खर्चाची फलनिष्पती समाधानकारक झालेली नाही.

**3.5 ग्रामपंचायत / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना व संपुर्ण ग्रामसमृध्दी योजनांच्या अपहार प्रकरणांबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरिक्षण) नियम 1965 चे नियम 19 अन्वये शोधून काढलेली लबाडी, अपहार किंवा कोणत्याही संशयास्पद परिस्थितीवरुन वाजवी अनुमान काढलेली प्रकरणे जिल्हा परिषदेस गोपनियरित्या कळविली गेली मात्र त्यावर खालील प्रकरणात अद्यापही कार्यवाही केलेली नाही.

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरिक्षण) नियम 1965 चे नियम 19 अन्वये शोधून काढलेली लबाडी, अपहार किंवा कोणत्याही संशयास्पद परिस्थितीवरुन वाजवी अनुमान काढलेली प्रकरणे जिल्हा परिषदेस गोपनियरित्या कळविली जातात. सदर तरतुदीचा उद्देश प्रामुख्याने अपचारी व्यक्ती विरुध्द त्वरित कार्यवाही केली जावी व अशा प्रकरणाना आळा बसावा हा आहे.

ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना व संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना मधील मार्च 2014 अखेरच्या अपहाराच्या एकूण 355 प्रकरणांमध्ये रक्कम रुपये 3,95,44,863.69 गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उपरोक्त प्रकरणे निकाली काढून रकमा वसूल करणेसाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणे बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असून त्यात गुंतलेल्या रक्कमासुध्दा मोठ्या प्रमाणात आहे. अशी प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असून त्यात गुंतलेल्या रक्कमासुध्दा मोठ्या प्रमाणात आहे. अशी प्रकरणे वर्षानुवर्षे राहिल्याने त्या विषयाची गांभिर्यता व परिमाणकारकता कमी होत जाते. अशा प्रकरणावर वेळीच कार्यवाही न केल्याने लबाडी / विषयाची गांभिर्यता व परिमाणकारकता कमी होत जाते. अशा प्रकरणावर वेळीच कार्यवाही न केल्याने लबाडी / अपहार करणारे कर्मचाऱ्यांवर वेळीच कार्यवाही होऊ शकत नाही. परिणामी अपहारीत रक्कमेच्या वसूलीबाबत विलंब होतो. ग्रामपंचाय मधील व्यवहार अभिलेखे तपासणीसाठी विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) ही पदे प्रशासनाने निर्माण केलेली असतांना अपहार / लबाडी प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित का राहतात. या संदर्भात नियमोचित खुलासा लेखापरिक्षणास करावा. तसेच कालव्ययामुळे अशा रक्कमांची वसूली होणे दुरापस्त होते. आजतागायत ज्या काही अपहार / लबाडी प्रकरणांच्या बाबतीत जिल्हा परिषदेने कार्यवाही पुर्ण करुन आदेश निर्गमित केले आहेत. त्याचे अवलोकन केले असता व बऱ्याच प्रकरणी अपचारी व्यक्ती / ग्रामसेवक मयत झालेचे दिसून येते. तसेच अपचारी कर्मचारीने जी काही शासकीय रक्कम लेख्याबाहेर ठेवली अशा कर्मचाऱ्यांकडून सदरची रक्कम दंडनिय व्याजासह वसूल केल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असलेले अशा प्रकरणांबाबत वेळीच कार्यवाही न केल्याने संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन शासकीय रक्कमेची नियमोचित वसूली केली जात नाही. तसेच याबाबत कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन प्रकरणे त्वरित निकाली काढून गंभीर अनियतिततांच्या संदर्भात नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

**3.6 जिल्हा परिषदेकडिल अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने रिकामी राहणेबाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषदेकडील सामान्य प्रशासन विभागाकडे अधिकारी व कर्मचारी 98 निवासस्थाने दिनांक 29/09/2009 रोजी बांधुन कौटुंबिक वापरासाठी सुरु केलेली आहे. त्यापैकी वर्ग-1 ची पाच निवासस्थाने आणि वर्ग-2 अधिकाऱ्यांची सहा निवासस्थाने 7 वर्षापासून रिकामी आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाव 2010/प्रक्रं-4/सेवा-5 दिनांक 19/04/2011 अन्वये शासकिय कर्मचाऱ्यांच्या सुधारीत वेतन संरचने नुसार कर्तव्यस्थानी पुरविलेल्या निरनिराळया प्रकारच्या शासकिय निवासस्थानांसाठीचे अनुज्ञाप्ती शुल्काचे दर नमूद केले आहेत व ते दिनांक 01/05/2011 पासून लागू आहेत. तसेच मुख्य निवासस्थानाच्या बरोबरीचे अतिरिक्तं जागेबाबतचेही दर त्यांत नमूद आहेत तथापी सा प्र वि यांचेकडील निवासस्थान नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नसल्याने याबाबतची खात्री करता आली नाही. परंतु निवासस्थानांचे शासकिय निर्णयानुसार वर्ग-1 आणी वर्ग-2 यांच्या निवासस्थानांच्या भाडया विषयी विचार केल्यास एका निवासस्थानाचे दरमहा भाडे साधारण 4,000/- ते 5,000/- असून त्याबाबत 11 निवासस्थानांचे दर महा 50,000/- प्रमाणे एकूण 55,000/- नुकसान होत आहे व सदरचे जिल्हा परिषदेचे आर्थीक नुकसान जवळ जवळ सप्टेंबर 2009 पासून होत आहे म्हणजेच 7 वर्षाचे (84 महिन्यांचे दरमहा रुपये 50,000/-) दरमहा रुपये 50,000/- प्रमाणे रुपये 42,00,000/- अक्षरी रक्कम रुपये बेचाळीस लाख रु चे आर्थीक नुकसान झालेले आहे. या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कडक प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) शासन परिपत्रक प रा स -1089/सीआर-3652/26,दिनांक 30/061993 मधील 16 अन्वये दर सहा महिन्यांनी मा. मुख्यकार्यकारी अधिकारी तथा निवासस्थान वाटप समितीने भरलेल्या आणि रिक्त निवासस्थानांबाबत आढावा घेवून जिल्हा परिषदेकडील सर्व 100 टक्के निवासस्थाने वाटप झालेले आहे व अनुज्ञाप्ती सेवा शुल्कं यांची संपूर्ण वसूली होत आहे याची खात्री करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रमाणे निवासस्थाने मोठया प्रमाणावर रिक्त असल्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने सदरची कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

### 3.7 सेवा प्रवेशोत्त्र परिक्षा उत्तीर्ण नसतांना नियमित वेतन वाढी अदा केले बाबत.

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** सामान्य प्रशासन विभागातील 11 कर्मचारी सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियमावली 1985 मधील नियम 4 (1) अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-8, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 20/01/1986 अन्वये जिल्हा परिषदेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याने ही परिक्षा तीन संधीमध्ये व चार वर्षाच्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. नियम 5 (1) ब तरतुदीनुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन 3 वेतनवाढी नंतरची चौथी वेतनवाढ बंद करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि विभागाने सदर बाबींवर नियंत्रण न ठेवल्यामुळे नियमित व नियमबाह्य वेतनवाढी मंजुर केलेल्या असुन अति प्रदान करण्यांची गंभीर अनियमितता केलेली आहे.

### 3.8 ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणांबाबत.

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषदेमध्ये दिनांक 31/03/2015 अखेर ग्रामपंचायत अफरातफरीचे एकूण 740 प्रकरणे प्रलंबित असुन त्यात रक्कम रुपये 6,42,09,498/- गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती विस्तार अधिकारी यांनी परिपुर्ण दप्तर तपासणी केली नसल्याने नमुद अपहार प्रकरणांबाबत कार्यवाही सुरु, चौकशी अभावी प्रलंबीत, वसूली सुरु असल्याचे दर्शविले आहे. याबाबत विस्तार अधिकारी यांची अकार्यक्षमता स्पष्ट होते. दिनांक 31/03/2015 अखेर एकूण 740 प्रकरणात रक्कम रुपये 6,42,09,498/- गुंतुन प्रलंबित आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2005/ प्र.क्र.262/पंरास,दिनांक 03/09/2005 नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. परंतु बहु तांशी अपहार अथवा गैरव्यवहार प्रकरणांबाबत शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन क्रमांक डीईएस/2006/ प्र.क.771/आस्था-12,दिनांक 28/9/2006 ग्रामपंचायतींचे अपहाराबाबत ग्रामपंचायत विस्तार अधिकारी / कनिष्ट अभियंता, शाखा अभियंता, व गटविकास अधिकारी यांनाही जबाबदार धरण्यात यावे.

4) दिनांक 31/3/2015 अखेर ग्रामनिधी/जरोयो/जग्रासंयो/संग्रारोयो/निधीतील अफरातफरीची एकूण रक्कम रुपये 6,42,09,498/- संबधितांकडुन वसुल करणेत यावी.

### 3.9 अखर्चित रक्कम शासनास परत न करणेबाबत.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-15 (परिच्छेद क्रमांक 2) -** ग्रामपंचायत विभागाच्या सन 2014-15 आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी खालील नमुद केल्याप्रमाणे सन 2014-2015 या आर्थिक वर्षाची अखर्चित रक्कम खर्च न झाल्याने जिल्हा परिषद स्तरावर शिल्लक असल्याचे दिसून येते**.**

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता रूपये 2,68,33,225/- महाराष्ट्र शासन**,** वित्त विभाग**,** शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 10.02/प्र**.**क्र**.**128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनास परत करणे बंधनकारक करणेत आलेले असतांना अखर्चित असल्याचे दिसून येते**.** सदर अखर्चित रक्कम शासन खाती त्वरीत जमा होणे आवश्यक आहे.

### 3.10 व्यायामशाळा साहित्य संच पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा परिषद निधी मधून रक्कम रुपये 5,00,00,000/- या रकमेची तरतूद या योजनेसाठी केली आहे. या अंतर्गत 10 टक्के ग्रामपंचायत हिस्सा व 90 टक्के जिल्हा परिषद हिस्सा या प्रमाणात सदर योजना राबविणेकरिता मे.ग्लोबल फिटनेस, ठाणे यांना पुरवठा आदेश दिलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 10 टक्के ग्रामपंचायत हिस्सा व 90 टक्के जिल्हा परिषद हिस्सा या प्रमाणात सदर योजना राबवायची असतांना ग्रामपंचायतीने 10 टक्के हिस्स्याची रक्कम पंचायत समितीकडे जमा करुन जिल्हा निधीत भरल्या नंतर निविदा धारकास अंतिमतः अदा करणे आवश्यक असताना अशी 10 टक्के रक्कम 55,55,555/- पंचायत समितीने जमा करून जिल्हा निधीत भरल्याचे दिसून आले नाही व तसे अभिलेखे नस्तीस नाहीत.

2) ई-निविदा अटी व शर्तीमध्ये नमुना संचांची तांत्रिक तपासणी शासकीय तंत्रनिकेतन अथवा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र या शासन मान्य त्रयस्थ संस्थेकडून करून घेणेची अट असताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी उपअभियंता यांत्रिकी उपविभाग भूजल सर्वेक्षण जिल्हा परिषद, पुणे यांचे कडून नियमबाह्य रित्या तपासणी करून घेतली आहे त्यामुळे गुणवत्तेची शाश्वती देता येत नाही.

3) करारनामा शर्त क्रमांक 13 प्रमाणे ग्रामपंचायतींना साहित्य वाटप केल्यानंतर ठेकेदाराने ग्रामसेवकाची पोहोच पावती व साठा नोंदवहीत नोंद घेतल्याची पृष्ठांकित माहिती जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभागाला सादर करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) प्रशासकीय विभागाने तांत्रिक मान्यता दिनांक 08.08.2014 रोजी दिलेली असून पुरवठा आदेश दिनांक 16.07.2014 रोजी आगाऊ दिलेले आहेत.

5) योजनेची प्रसिध्दी व्यापक प्रमाणात करणे आवश्यक असताना फक्त दोनच ‘अ’ वर्गाच्या दैनिक वर्तमान पत्रात व एकाच दिनांकास जाहिरात प्रसिध्द केल्याने सदर योजनेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी दिलेली नाही.

6) योजनेची मास्टर नोंदवही तपासली असता एकाच ग्रामपंचायतीस तिच्या वाड्या, वस्त्यांसह योजनेचा लाभ 3 ते 4 वेळा दिलेला आहे. ग्रामपंचायत निहाय योजना राबविणेची उद्दिष्ट असताना जिल्ह्यातील एकूण 1408 ग्रामपंचायतींचा वर्षनिहाय आराखडा तयार करून योजना राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. योजनेची उपयुक्तता, फलनिष्पत्ती अहवाल व योजना पुढे चालू ठेवण्याबाबत अभिलेखे नस्तीला नाहीत.

7) सन 2013-14 मधील न्यूनतम निविदा धारक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ पुणे यांचे नमुना साहित्य सन 2014-15 साठी तपासणीस आलेले असून नमुना तपासणीच्या सर्व निष्कर्षा मध्ये योग्य असताना निविदा प्रक्रियेमध्ये त्याचा उल्लेख आढळला नाही. मागील वर्षाच्या सन 2013-14 च्या भावात साहित्य उपलब्ध करून घेण्याविषयी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ पुणे यांच्याशी पत्र व्यवहार केल्याचा तपशील नस्तीमध्ये आढळुन आला नाही.

8) पुरवठा दाराशी केलेला करार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 116 प्रमाणे जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहोर बंद करण्याची कार्यवाही केलेली नाही. खरेदी समिती कार्यवाही नोंदवही नाही.

9) निविदा मार्गदर्शन सूचना नुसार निविदा धारकाने पुरवठा आदेश एकच असताना 3 टप्प्यात पुरवठा केल्याने अटी व शर्ती नुसार प्रति आठवडा 2 टक्के विलंब रक्कम कपात केलेली नाही. शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 17/05/2013 अन्वये संबंधितांच्या बँक खात्या मध्ये रक्कम जमा झाले बबत RTGS व UTR नंबर नस्तीस नाहीत.

### 3.11 मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणेबाबत

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** सन 2014-15 मध्ये मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणे (मुख्य लेखाशिर्ष 2515) बाबत शासन निधीमधून रक्कम रूपये 7,39,95,544/- या निधीवितरण व खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणेसाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत पर्यावरण विकास आराखडा कामांना निधी वितरीत केला जातो. प्रशासकीय मान्यतेतील निवड केलेल्या 19 ग्रामपंचायतींना प्रति ग्रामपंचायत रूपये 25,00,000/- इतके अनुदान मंजुर असतांना प्रती ग्रामपंचायत रूपये 10,00,000/- याप्रमाणे वितरीत केले असल्याने उर्वरीत रक्कम अखर्चित राहिलेली आहे.

2) सन 2013-14 मधील अखर्चित रक्कम रुपये 4,57,35,000/- यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी दिलेली असून यापैकी 1,15,99,000/- ही रक्कम पर्यावरण विकास आराख़डा तयार करणे या योजने अंतर्गत मंजुर असून दोन संस्थांना वितरीत केलेला आहे.

3) सदर नस्तीमध्ये रक्कम रूपये 2,85,00,000/- इतक्या रकमांचे बॅक ॲडव्हाईस प्राप्त असून सन 2014-15 चे अनुदान व अखर्चित रक्कम या उर्वरीत रकमांचे हिशोब नस्तीला आढळून न आल्याने अखर्चित रक्कम कुठे व कशी खर्च केली याचा तपशील नस्तीला नाही.

4) सन 2014-15 मधील प्रशासकीय कामांना तांत्रिक मंजुरी उपलब्ध नाही. तसेच नियोजन विभागाच्या दिनांक 16/02/2008 च्या शासन निर्णयान्वये वर्ष अखेरीस 5 मार्च पर्यंत अखर्चित निधी जिल्हाधिकारी यांना कळविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच दरमहा खर्चाची मासिक पत्रके जिल्हाधिकारी यांना सादर केलेली नाहीत.

5) अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे, काम पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्रे नस्तीला नाहीत.

6) प्रशासकीय मान्यते अंतर्गत त्या ग्रामपंचायतींनी आराखडा तयार करून मान्यता घेवून त्यानंतर शासन निर्णय व्हीपीएन/2610/प्र.क्र.129/परा 4,दिनांक 16/09/2010 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांची व कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता नस्तीला आढळून आली नाही.

7) बाजारापेठ विकास, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, बागबगीचे, उद्याने यांना ग्रामपंचायतीने स्वनिधी उभारणेबाबत तपशील नस्तीला आढळून आला नाही.

### 3.12 महाऑनलाईन मुंबई यांना आयकराची रक्कम कमी कपात केल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** सन 2014-2015 मध्ये महाऑनलाईन मुंबई यांनी ग्रामपंचायतीस पुरविलेल्या ऑपरेटर यांना तेराव्या वित्त आयोगातून विविध प्रमाणकांद्वारे मोबदला रक्कम रूपये 22,14,76,939/- पैकी प्रदान रक्कम रूपये 10,06,16,640/- करणेत आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 व्या वित्त आयोगा अंतर्गत वितरीत निधीमधून महाऑनलाईन मुंबई यांनी ग्रामपंचायतीस पुरविलेल्या ऑपरेटर यांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.तेविआ-2011/प्र.क्र.42/वित्त 4, दिनांक 17/04/2012 अनुसार ग्रामपंचायतीस पुरविलेल्या ऑपरेटर च्या सेवेबद्दल मोबदल्याचे देयक अदा करताना 2

टक्के नुसार आयकर कपात करणेबाबत नमुद केलेले असले तरी भारतीय आयकर अधिनियमाच्या कलम 1961 च्या 194(J) नुसार 10 टक्के यादराने आयकर कपात करणे आवश्यक असताना तशी कपात केलेली नसल्यामुळे कमी वसुल केलेली आयकर रक्कम रूपये 1,98,10,836/- वसुल करून योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

**3.13 ग्रामपंचायत विभागाने ग्राम पंचायतींना अनुदान वर्ग केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाकडील ग्रामपंचायत विभागाने ग्राम पंचायतींना

अ) जनसुविधा योजने अंतर्गत - रक्कम रुपये 6,72,60,662/-

ब) इतर ग्रामीण विकास योजने अंतर्गत रक्कम रुपये -15,09,10,299/- अनुदान वर्ग केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 2014-2015 पूर्वी व सन 2014-2015 मध्ये ग्रामपंचायत विभागाने ग्राम पंचायतींना वर्ग केलेल्या अनुदानातून ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायतीने किती रक्कम खर्च केली व किती रक्कम शिल्लक आहे याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2) ग्रामपंचायत विभागाने ग्राम पंचायतींना वर्ग केलेल्या अनुदानातून ग्रामपंचायत स्तरावर किती कामे मंजूर झाली व किती कामे पूर्ण झाली. तसेच दिनांक 31-03-2015 अखेर किती कामे अपूर्ण राहिली व त्यामध्ये किती रक्कम गुंतून आहे याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

3) काम पूर्णत्वाचे दाखले नाहीत.

4) विनियोग दाखले घेतलेले नाहीत, उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केलेले नाही.

5) जनसुविधा अनुदान रुपये 6,41,94,076/- प्राप्त असून खर्च रुपये 2,32,19,705/- म्हणजे 36 टक्के खर्च केला असून रक्कम रुपये 4,09,74,371/- एवढा 64 टक्के कमी खर्च केल्याने अनुदान शिल्लक राहिले आहे.

6) नागरी सुविधा अनुदान रुपये 5,26,26,857/- प्राप्त असून खर्च रुपये 4,40,40,957/- म्हणजे 84 टक्के खर्च केला असून रक्कम रुपये 4,09,74,371/- एवढा 16 टक्के कमी खर्च केल्याने अनुदान शिल्लक राहिले आहे.

7) इतर ग्रामीण विकासासाठी रुपये 20,34,94,000/- अनुदान प्राप्त असून खर्च रुपये 15,09,10,299/- झाला आहे. म्हणजे रक्कम रुपये 5,25,83,701/- एवढा कमी खर्च केला आहे.

**3.14 सुधारीत वेतन श्रेणीतील फरक देय नसताना अदा केल्याने रक्कम अतिप्रदान.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती हातकणंगले ग्रामपंचायत विभागातील कर्मचारी श्री. आर.ए.सिदनाळे, ग्रामविकास अधिकारी यांना सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्यात आली. त्या अन्वये त्याचे फरक देयकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएसआर-2008/ पक्र.80/आस्था 5, दिनांक 25/09/2008 प्रमाणे 5 वा वेतन आयोगानुसार ग्रामसेवक पदाची वेतनश्रेणी 4000-100-6000 ही सुधारीत करुन 4500-125-7000 लागू करण्यात आली. सुधारीत वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चिती करुन दिनांक 31/03/2008 पर्यंतच्या काल्पनिक वेतनवाढी देणेचे असून त्याचा प्रत्यक्ष लाभ दिनांक 01/04/2008 पासून देणेचा आहे. परंतु त्यांना जानेवारी 2006 ते मार्च 2009 अखेर फरक रक्कम देय नसताना ती आहरीत करुन फरक रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा केल्याने त्यांना झालेले अतिप्रदान रक्कम रुपये 22,463/- वसूल होणे आवश्यक आहे.

**3.15 संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 मध्ये नमूद केलेनूसार संत गाडगेबाबा ग्राम

स्वच्छता अभियान योजनेची सन 2013-2014 मधील अखर्चित रक्कम रुपये 2,35,000/- सन 2014-2015 मध्ये खर्च करणे आवश्यक असताना जिल्हा परिषदेने सन 2014-2015 मध्ये काहीही रक्कम खर्च केलेली नाही. त्यांमुळे अखर्चित रक्कम रुपये 2,35,000/- इतकी योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासननिधीत भरणा करणे आवश्यक आहे.

### 3.16 जकात करांऐवजी ग्रामपंचायतींना नुकसान भरपाई अदाई बाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2699/प्र.क्र.982/22, दिनांक 22/09/1999 च्या अटी व शर्तीनुसार वित्तीय वर्ष 1999-2000 मध्ये सन 1998-1999 या वर्षी ग्रामपंचायतींना जकातीपासून जेवढे उत्पन्न मिळाले होते तेवढे अनुदान देण्यांत यावे व त्यानंतर दरवर्षी 10 टक्के वाढ देऊन हे अनुदान 5 वर्षापर्यत म्हणजे सन 2003-2004 या वित्तीय वर्षापर्यत देण्यांत यावे असे नमूद करण्यांत आलेले असतांना देखील सन 2014-2015 या वर्षामध्ये देखील सन 2013-2014 च्या उत्पन्नावर 10 टक्के वाढ देऊन त्याप्रमाणे सोलापूर जिल्हयातील ग्रामपंचायत अकलुज, नातेपुते, मोहोळ व वैराग या चार ग्रामपंचायतींना अदा करण्यांत आलेले आहे. सन 2003-2004 नंतर दरवर्षी 10 टक्के वाढ देण्यांत यावी असा उल्लेख सदरच्या शासन निर्णयामध्ये नसतांना देखील वाढ देऊन अनुदान अदा करण्यांत आलेले आहे.

तसेच सदर अनुदानातून जिल्हा ग्रामविकास निधी कर्जाची वसुली करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत अकलुज, नातेपुते, वैराग व मोहोळ या ग्रामपंचायतींना जिल्हा ग्रामविकास निधीतून किती कर्ज देण्यांत आलेले होते व त्यापैकी किती वसुल करण्यांत आले व अजून किती कर्ज सदरच्या ग्रामपंचायती देणे बाकी आहेत याबाबतची नोंदवही उपलब्ध झालेली नाही.

### 3.17 वाहन लिलावातील रक्कम जिल्हानिधी मध्ये जमा न करणे. (सेसफंड)

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाला निर्लेखीत केलेल्या चार वाहनाच्या लिलावाद्वारे रुपये 3,08,880/- रक्कम प्राप्त झाली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 49 नुसार रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्याच दिनांकाला नोंदवहीत नमुना 4 मध्ये नोंद घेवुन चलनाद्वारे संबंधित लेखाशिर्षात रक्कमा जमा करणे आवश्यक आहे. परंतु वाहन लिलावाद्वारे प्राप्त रक्कम रुपये 3,08,880/- रोखपुस्तकात जमा करण्यात आले नाही. तसेच रक्कमा चलनाद्वारे घसारा निधीत जमा करण्यात आल्या बाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास उपलब्ध करुण देण्यात आल्या नाहीत. सबब रक्कम वसूल करुन अनुपालन सादर करावे.

2) रोखपुस्तकातील प्रत्येक नोंदीची तपासणी करुन त्यावर आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर अनियमितता झाली असुन वाहनाच्या लिलावाद्वारे प्राप्त रक्कमेचा गैरवापर करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 3.18 लेखापरीक्षणाकरीता अभिलेखे सादर न करणेबाबत (जिल्हा परीष्द अमरावती मुद्रणालय कंत्राटी पद्धतीने चालवणे) (सेसफंड)

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाद्वारे मुद्राणालय चालविण्यात येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात जिल्हा परीषद मुद्रणालयातुन करण्यात आलेल्या छपाई कामाचे रुपये 16,55,067/- प्राप्त झाले.

2) उपरोक्त प्राप्त धनादेश जिल्हा निधीत जमा करणे आवश्यक असतांना सदर धनादेश सक्षम प्राधिकारी यांची पुर्व परवानगी न घेता अलाहाबाद बॅक, राठी नगर येथे दिनांक 03/10/2011 रोजी खाते क्रमांक 50080349817 उघडुन त्यात जमा केल्याचे आढळुन आले.

3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) या पदनामाने अलाहाबाद बॅंक, राठी नगर येथे खाते क्रमांक 500220177937 असतांना दुसरे खाते उघडण्याचे प्रयोजन काय? खुलासा करावा.

4) सन 2014-2015 मध्ये खाते क्रमांक 50080349817 मधुन रुपये 16,29,997 खर्च काण्यात आला. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 तथा महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक- लेखाप/2013/(7/13) वित्त-8, दिनांक 12/02/2013 अन्वये लेखापरीक्षणा करीता अभिलेखे उपल्ब्ध करून देणे अनिवार्य असताना उपरोक्त खर्चाची प्रमाणके तसेच इतर अनुषंगीक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुण देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 06/01/2016 द्वारे नियमित मागणी करुन सुध्दा बॅंक स्क्रोल व्यतिरीक्त कोणतेही अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

**3.19 वाहन क्रमांक एम.एच.30 एच.477 या कार्यक्षेत्राच्या बाहेर प्रवासाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** समान्य प्रशासनाअंतर्गत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वाहनाने वरिष्ठांची पुर्वपरवानगी न घेता जिल्हयाबाहेर अनियमित प्रवास केल्याचे आढळते याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 02/08/1993 नुसार वाहन क्रमांक एम. एच. 30 एच 477 वाहनाने वरिष्ठांची पुर्वपरवानगी न घेता 1100 किमी जिल्हयाबाहेर प्रवास केला.

2) जिल्हयाबाहेर प्रवासासाठी पुर्व परवानगी घेतल्याचे आढळत नाही. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जेईपी 10/सी आर 19/2000/05,दिनांक 24/04/2000 नुसार अशा प्रवासास कार्योत्तर परवानगी देता येणार नाही. तरी याबाबत शासकिय दर 8 रुपये प्रति किलो मीटर दराने 8,800/- रुपये संबधिताकडून वसूल करून जिल्हा परिषद उपकर मध्ये जमा करावे.

**3.20 वाहन क्रमांक एम.एच. 30 एच. 432 खरेदी इंधनाची नोंद लॉग बुकात न घेणेबाबत इतर अनियमियतेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** वाहन क्रमांक एम. एच. 30 एच 432 करिता दिनांक 27/07/2014 रुपये 500/- व दिनांक 28/02/2015 रुपये 2,284/- इंधन खरेदी केले परंतू लॉगबुकला नोंदी घेण्यात आल्या नाहीत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन क्रमांक एम.एच. 30 एच 432 करीता दिनांक 27/07/14 रुपये 500/- व दिनांक 28/02/2015 रुपये 2284/- इंधन खरेदी केले परंतू लॉगबुकला नोंदी घेण्यात आल्या नाहीत. एकूण रुपये 2,784/- संबधितांकडून वसूल करून जिल्हा परिषद उपकर मध्ये जमा करण्यात यावे.

2) दिनांक 21/10/2014 ते 30/10/2014 गाडी वापरणा-यांची स्वाक्षरी नाही. दिनांक 01/11/2014 ते 11/11/2014 पर्यंत गाडीचे लॉगबुक लिहलेले नाही.

**3.21 अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालयाकरीता फर्निचर खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15)** - जिल्हा परिषद अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालयाकरीता जिल्हा परिषद सेस निधीतुन रुपये 2,70,403/- व शासकीय निधीतुन रुपये 3,20,725/- अन्वये फर्निचर व इतर साहित्याची खरेदी केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस/1093/(2635)/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 मधील परिच्छेद क्रमांक 3 मधील तरतुदीनुसार दरकरार व्यतिरिक्त एका वस्तुची खरेदी करताना वार्षिक खरेदी रुपये 50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही. जिल्हा परिषदेने साहित्य खरेदीसाठी जाहीर निविदा कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

2) सभापती समाज कल्याण यांचे निवासस्थानी मागणी नसतांना नियमबाहयपणे वस्तुची खरेदी करण्यात आली. पुरवठा आदेशाचे पुर्वी प्राप्त पुरवठा दरकरार कधी प्राप्त झाले त्याबाबत आवक नोंदवहीला नोंद घेण्यात आली नसल्याने खात्री करता येत नाही. कार्यालयातील साहित्य दरकरार न मागविता, पुरवठा आदेश न देता घेण्यात आले आहेत.

3) जिल्हा परिषद अध्यक्ष यांचे मागणी पत्र क्रमांक 2 दिनांक 04/07/2014 नुसार करण्यात आलेल्या खरेदीचे दरकरार, पुरवठा आदेश, खर्च मंजुरी आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही.

4) सभापती शिक्षण व आरोग्य यांचे निवासस्थाना करीता केलेल्या फर्निचर खरेदी बाबत टिपणी नुसार धानादेश क्रमांक 7787 रुपये 39,900/- दिनांक 18/09/2014 पुरवठादारास धनादेश न देता नियमबाहयपणे सभापती यांना वितरीत करणेत आला. याबाबत दरकरार, पुरवठा आदेश, खर्च मंजुरी आदेश, लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

5) सभापती कृषी व पशुसंवर्धन यांच्या करीता टिपणी वरील मागणी नुसार ऑफिस टेबल, संगणक टेबल, स्विय सहायक टेबल इत्यादीची मागणी असतांना प्रत्यक्षात सोफासेट खरेदी करण्यात आलेला आहे.

6) सभापती, महिला व बाल कल्याण यांचे कार्यालयाकरीता केलेल्या साहित्य खरेदी मधील सोफासेटच्या किंमतीपेक्षा इतर पदाधिकारी यांचे करीता केलेल्या सोफासेट हे जादा दराने खरेदी करणेत आलेले आहेत. जादा दाराने केलेली खरेदी रक्कम रुपये 9,500/- जिल्हा परिषद उपकरात व रक्कम रुपये 2,000/- शासनखाती वसुल करुन जमा करावी.

7) टिपणी दिनांक 25/05/2014 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षाकरीता 20 नग स्टिल रेगझिन फोम खुर्चीची मागणी करणेत आली असतांना प्रमाणक क्रमांक 526 दिनांक 21/10/2014 रुपये 49,500/- अन्वये जादा 11 खुर्ची खरेदी करणेत आल्या त्यांची साठा नोंदवहीत नोंद नमुद नाही. तसेच मुख्य लेखा व वित्त् अधिकारी यांचे कक्षाकरीता खरेदी करण्यात आलेल्या खुर्च्याचे खरेदीचे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केलेले नाहीत. एकुण रुपये 1,98,000/- नियमबाहयपणे केलेल्या खरेदीबाबत जबाबदारी निश्चित करुन सदर रक्कम शासनखाती भरणा करण्यात यावी.

8) प्रमाणक क्रमांक 426 दिनांक 01/10/2014 अन्वये रुपये 26,725/- मधील स्टील बुक केस खरेदी करीता पुरवठा आदेश क्रमांक 2923/2014, दिनांक 05/06/2014 अन्वये पुरवठा दिनांक 30/06/2014 पुर्वी करणे आवश्यक असतांना दिनांक 20/08/2014 रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुसार एम.एस.एस.आय.डी.सी. यांना दरकराराप्रमाणे विलंबाबाबत दंडाची आकारणी करणेत आलेली नाही.

9) उपरोक्त प्रमाणकान्वये झालेला खर्चाबाबत वेळोवळी तोंडी व अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 22/12/2015, अर्धसमास पत्र क्रमांक 07 दिनांक 31/12/2015, अर्धसमास पत्र क्रमांक 10 दिनांक 05/01/2016, अर्धसमास पत्र क्रमांक 13 दिनांक 29/01/2016 नुसार मागणी करुनही परिपुर्ण अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत व अर्धसमास पत्राची उत्तरेही सादर केलेली नाहीत.

10) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक एसीडी 1099/प्र.क्र.214/05 दिनांक 25/10/1999 मधील तरतुदीनुसार पदाधिकाऱ्यांनी स्वत:च्या सही शिक्यानिशी फर्निचर मिळाल्याची पोच दयावी व कालावधी संपल्यानंतर नोंदीप्रमाणे तपासुन फर्निचर जिल्हा परिषद ने ताब्यात घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर उप मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी केलेली नाही. यापुर्वीचे पदाधिकारी यांना निवासस्थानी पुरवठा केलेल्या साहित्याची यादी मागणी करुनही प्राप्त झालेली नाही. त्यामुळे पुर्वीचे खरेदी केलेले फर्निचर निकामी झालेबाबत खात्री करता आली नाही.

11) पुरवठा दाराकडून आयकर 2 टक्के व मुल्यावर्धीत कर 4 टक्के वसुल करुन शासन खाती भरणा करावा.

**3.22 कार्यालयीन साहित्य खरेदी खर्चाचे अभिलेखे उपलब्ध न होणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17)** - सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वाशिम येथील वित्तीय वर्ष सन 2014-2015 चे लेखापरिक्षण तपासणीत जिल्हा परिषद सेस मधुन केलेल्या साहित्य खरेदी व दुरुस्तीचे देयकाची एकुण गुंतलेली रक्कम रुपये 7,63,276/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 4, 5 व 6 नुसार लेखापरिक्षणास अभिलेखे संस्थेचे कार्यालय प्रमुख यांनी उपलब्ध करुन दिलेले नाहीत. अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 18/12/2015, पत्र क्रमांक 02 दिनांक 12/12/2015, पत्र क्रमांक 03 दिनांक 23/12/2015, पत्र क्रमांक 7,8,9,11,12,13 व 14 दिनांक 30/01/2016 अन्वये वारंवार मागणी करुनही खरेदी संबंधी कोणतेही अभिलेखे व परिपुर्ण नस्ती तसेच साठा रजिस्टर उपलब्ध करण्यात आलेली नाही. तसेच अर्धसमास पत्राचे लेखी उत्तर लेखापरिक्षणात प्राप्त झालेले नाही. त्यामुळे उपरोक्त खर्चाची पडताळणी करता आली नाही. उपरोक्त बाबीवर सन 2014-15 यावर्षात झालेला खर्च संबंधिताकडून वसुल करुन जिल्हा परिषद उपकर निधीत भरणा करणे आवश्यक आहे. तसेच अभिलेखे सादर न करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

**3.23 अंदाजपत्रकाबाबत**

**जिल्हा परीषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खर्चाचा अहवाल अप्राप्त असल्यामुळे प्रत्यक्षात किती रक्कम खर्च झाली ही पडताळणी करता आली नाही.

2) प्राप्त तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 20,64,019/- कमी खर्च करण्यात आला आहे.

3) काही बाबींवर तरतुद असतांना रक्कम का खर्च केले नाही खुलासा करावा.

4) अंदाजपत्रकात अवास्तव तरतुदी केल्याचे आढळून आले.

5) वारंवार विनंती करुनही लेखाशिर्षनिहाय खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही.

6) वार्षिक लेखे तयार करुन वित्त विभागाकडे सादर केल्याचे आढळून आले नाही.

**3.24 स्थायी समिती/जिल्हा परिषद विशेष व सर्वसाधारण सभेला पदाधिकारी व अधिकारी हजर असतांना त्यांचे वाहनाचे धावपुस्तीकेनुसार दौरा दर्शवुन केलेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्थायी समिती सभा दिनांक 27/08/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 86 नुसार अर्थ व बांधकाम सभापती सभेला हजर असतांना, वाहन क्रमांक MH-28-C-6474 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 27/08/2014 रोजी वेळ 07.30 ते 21.00 बुलडाणा ते काळेगांव व इतर विकास कामांचा आढावा घेण्यासाठी 196 किलोमीटर प्रवास कसा केला. कृषी व पशुसंवर्धन सभापती सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH-28-C-6467 धावपुस्तिकेनुसार दिनांक 27/08/2014 रोजी वेळ 07.00 ते 23.00 बुलडाणा ते लव्हाळा, मेहकर व इतर पंचायत समितीस भेट व आढावा घेण्यासाठी 180 किलोमीटर प्रवास कसा केला. महिला व बाल कल्याण सभापती सभेला सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH-28-C6454 धावपुस्तिकेनुसार ते दिनांक 27/08/2014 रोजी वेळ 08.00 ते 22.00 बुलडाणा ते बोराखेडी व इतर ठिकाणी अंगणवाडी भेटीसाठी 202 कीलोमीटर प्रवास कसा केला.

2) स्थायी समिती सभा दिनांक 05/06/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 77 नुसार कृषी व पशुसंवर्धन सभापती सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH-28-C-6467 धावपुस्तीकेनुसार त्यांनी दिनांक 05/06/2014 रोजी वेळ 07.00 ते 15.00 बुलडाणा ते हतेडी व इतर पशुपालक भेटीसाठी 75 कीलोमीटर प्रवास कसा केला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6446 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 05/06/2014 रोजी (वेळ नमुद नाही) बुलडाणा ते देऊळगाव राजा व इतर पंचायत समितीस भेट व विकास कामांचा आढावा घेण्यासाठी 158 किलोमीटर प्रवास कसा केला.

3) स्थायी समिती सभा दिनांक 31/07/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 83 नुसार कृषी व पशुसंवर्धन सभापती हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C-6467 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 31/07/2014 रोजी वेळ 07.00 ते 14.00 बुलडाणा ते मेरा व इतर कृषी केंद्राना भेटीसाठी 140 किलोमीटर प्रवास कसा केला.

4) स्थायी समिती सभा दिनांक 21/10/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 92 नुसार कृषी व पशुसंवर्धन सभापती सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6467 धावपुस्तिकेनुसार पडताळणी केली असता, ते दिनांक 21/10/2014 रोजी वेळ 08.00 ते 21.00 बुलडाणा ते खामगांव व इतर पंचायत समितीस भेटीसाठी 220 किलोमीटर. प्रवास कसा केला. मा.अध्यक्ष जिल्हा परिषद सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C-6460 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 21/10/2014 रोजी वेळ 09.00 ते 24.00 बुलडाणा ते चिखली व इतर ठिकाणी विकास कामांना भेटीसाठी 110 किलोमीटर प्रवास कसा केला.

5) स्थायी समिती सभा दिनांक 07/05/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 74 नुसार अध्यक्ष जिल्हा परिषद सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6460 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 07/05/2014 रोजी वेळ 10.00 ते 21.00 बुलडाणा ते खामगांव व इतर ठिकाणी विकास कामांना भेटीसाठी 90 किलोमीटर प्रवास कसा केला.

6) स्थायी समिती सभा दिनांक 04.07.2014 चे हजेरीपट पान क्रमांक 80 नुसार अध्यक्ष जिल्हा परिषद सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6460 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 04/07/2014 रोजी वेळ 09.00 ते 22.00 बुलडाणा ते खामगांव व इतर ठिकाणी आयोजीत कार्यक्रमास भेटीसाठी 145 किलोमीटर प्रवास कसा केला.

7) स्थायी समिती सभा दिनांक 13/01/2015 चे हजेरीपट पान क्रमांक 100 नुसार मा.अध्यक्ष जिल्हा परिषद सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6460 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 13/01/2015 रोजी वेळ 08.00 ते 20.00 बुलडाणा ते मोताळा व इतर ठिकाणी विज्ञान प्रदर्शनी कार्यक्रमास भेटीसाठी 80 किलोमीटर प्रवास कसा केला.

8) स्थायी समिती सभा दिनांक 11/03/2015 चे हजेरीपटमहिला व बाल कल्याण सभापती सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C6471 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 11/03/2015 रोजी वेळ 07.15 ते 20.45 बुलडाणा ते चिखली व इतर ठिकाणी 173 किलोमीटर प्रवास कसा केला.

9) जिल्हा परिषद विशेष सभा दिनांक 13/06/2014 चे हजेरीपट पान क्रमांक 103 नुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH-28-C6446 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 13/06/2014 रोजी वेळ 09.00 ते 19.00 बुलडाणा ते पिंपळगाव सराई व इतर ठिकाणी ग्रामपंचायत भेटीसाठी 71 किलोमिटर प्रवास कसा केला. मुख्य कार्यकारी अधिकारी सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C-6471 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 13/06/2014 रोजी वेळ 09.00 ते 22.30 बुलडाणा ते जळगांव जामोद व इतर 188 किलोमीटर प्रवास कसा केला.

10) सर्वसाधारण सभा दिनांक 27/03/2015 चे हजेरीपट पान क्रमांक 152 नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सभेला हजर असतांना वाहन क्रमांक MH28-C-6471 धावपुस्तिकेनुसार त्यांनी दिनांक 27/03/2015 रोजी वेळ 08.00 ते 21.30 बुलडाणा ते रोहिणखेड व इतर ठिकाणी जिल्हा परिषद हायस्कुल भेटीसाठी 94 किलोमीटर प्रवास कसा केला.

### 3.25 शासकीय वाहनांचा विमा उतरविण्यातील अनियमितता.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद नागपूर, सामान्य प्रशासन विभागाकडे असलेल्या वाहनांचा विमा काढण्याकरिता सन 2014-2015 मध्ये रूपये 1,33,541/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचा विमा ओरीयंट इंशुरंन्स कंपनी यांचेकडे उतरविण्यात आलेला असून ही कंपनी खाजगी आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक ए.आय.एफ-2183/सि.आर-174/83/ए.डी.एम-5, दिनांक

16/01/1984 नुसार तसेच, शासकीय विमा निधी संचलनालय यांचे पत्र क्रमांक प्रविनी/14/2015/जि.प.नागपूर/संकीर्ण/09/मो.वि.-1, दिनांक 22/05/2015 नुसार जिल्हा परिषदेतील वाहनांचा विमा शासकीय विमा निधीकडे काढण्याबाबत सुचना आहेत. परंतु विभागाने यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**3.26 भरती प्रक्रिया सन 2014 करीता देण्यात आलेल्या अग्रिमाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** सामान्य प्रशासन विभागाचे सन 2014 - 2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना श्री. विशाल मेहत्रे, कनिष्ठ सहायक, यांना भरती प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा परिषद सेस फंडातून एकूण रुपये 5,00,000/- अग्रिम देण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भरती प्रक्रिया सारखी महत्वाची प्रक्रियाची जबाबदारी ही कनिष्ठ सहाय्यका कडे का देण्यात आली? याबाबत कोणतेही नस्ती सादर नाही. त्यामुळे त्यांना अग्रीम अनुज्ञेय ठरत नाही.

2) श्री.विशाल मेहत्रे यांना रोखपालाचे काम देण्यात आल्यामुळे, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 43 अन्वये जामीनकीचे बंधपत्र घेण्यात आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210(ब) नुसार आधी घेण्यात आलेल्या अग्रीमाचे समायोजन होण्यापूर्वी दुसरे अग्रिम मंजूर करण्यात येवू नये. तसेच रुपये 1,000/- वरील अग्रीमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु विभागाने रुपये 1,50,000/-चे समायोजन होण्यापूर्वी दुसरे अग्रिम रक्कम रुपये 3,50,000/- प्रदान केले आहे.

4) भरती प्रक्रियाकरिता लागणाऱ्या खर्चाचे अंदाजित प्राकलन नाही. श्री.विशाल मेहत्रे यांनी अग्रीम मागणी केल्याबाबतचा अर्ज नाही.

5) अग्रिम समायोजन सन 2014-2015 या वित्तीय वर्षात होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.27 बाजार लिलावाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद भंडाराच्या सामान्य प्रशासन विभागाने सन 2014-2015 मध्ये तिन वेळा बाजार लिलावाची जाहीरात दिली बाजार लिलाव दिनांक 20/01/2014 ला 17 बाजाराचे लिलाव करण्यात आले. दिनांक 06/03/2014 एकही बाजाराचे लिलाव करण्यात आले नाही तर दिनांक 25/07/2014 व 14/08/2014 ला चार बाजाराचे लिलाव करण्यात आले तीन लिलावा दरम्यान एकुण 21 बाजाराचे लिलाव करुन रक्कम रुपये 25,61,800/- जिल्हा परिषद खात्यात जमा करण्यात आले तर या लिलावादरम्यान 15 बाजाराचे लिलाव करण्यात आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत विभागाव्दारे तीन लिलाव दरम्यान बैठकी बाजार 09, मवेशी बाजार 01, घोडा यात्रा 01, आमराई 03, व शेणखत पवनी 01 असे एकुण 15 बाजाराचे लिलाव करण्यात आले नाही. दुसरे लिलावाच्या वेळी आचार संहिता असल्यामुळे लिलाव करण्यात आला नाही. तर तिसऱ्या लिलावाचे वेळी कमी बोली असल्यामुळे परत दिनांक 14/08/2014 ला लिलाव करण्यात आला त्यानंतर लिलाव करण्यात आला नाही. त्यामुळे वित्तीय वर्ष 2011-2012 ते 2013-2014 या वर्षा दरम्यान लिलाव न झालेल्या बाजाराचे सरासरी उत्पन्न रुपये 1,82,282/- चे जिल्हा परिषदेचे नुकसान झाले. तसेच जिल्हा परिषदेने बाजाराच्या रक्कम वसुल करण्याकरीता ग्रामपंचायतीस मंजुरी दिल्याचा अभिलेख लेखा परिक्षणास सादर केला नाही.

**3.28 मंजुर पदापेक्षा जादा पदांचे नियुक्त्यांमुळे वेतन व भत्याचे नुकसानी बाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2)** - सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात सादर केलेल्या जिल्हा परिषद अंतर्गत गट क व ड श्रेणीतील सरळ सेवा व पदोन्नतीच्या मंजुर नुसार शिक्षण विभाग केंद्र प्रमुखाची 26 पदे मंजुर असतांनी 61 पदे भरलेली आहेत. तसेच प्राथमिक शिक्षकांची 3755

मंजुर पदे असतांनी 3839 पदे भरलेली आहेत. त्यानुसार केंद्र प्रमुखांची 35 व प्राथमिक शिक्षकांची 84 एकुण 119 जादा पदे भरल्याचे दिसुन आले. लेखापरीक्षणाचे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजुर पदापेक्षा जादा पदभरती 119 बाबत कारणे स्पष्ट करावी.

2) जादा पदांबाबत समायोजनाची कार्यवाही नाही. त्यामूळे जिल्हा परिषदेचे होणा-या आर्थिक नुकसानीची परीगणना करून जबाबदारी निश्चीत करावी.

3) जिल्हानिधीचे तरतूद व खर्च विवरण पत्रानुसार वर्ग 3 व 4 पदभरतीवरील खर्च हा तरतूदी पेक्षा रूपये 28,430/- ने अधिक दिसून येतो.

### 3.29 सन 2014-2015 या कालावधीत नवनियुक्त कंत्राटी ग्रामसेवकांना नियुक्तीपुर्व विशेष मुलभुत प्रशिक्षण देणेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** नवनियुक्त कंत्राटी ग्रामसेवक यांना ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही येथे दिनांक 02/03/2015 ते 16/03/2015 या कालावधीत नियुक्तीपुर्व विशेष मुलभुत प्रशिक्षण देण्याकरीता खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशिक्षण घेतलेल्या या 12 प्रशिक्षणार्थ्यांची प्राचार्य, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही यांचेकडुन स्वाक्षरीनीशी प्रमाणित यादी नस्तीला आढळुन आली नाही.

2) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही येथे नवनियुक्त कंत्राटी ग्रामसेवकांना दिनांक 02/03/2015 ते 16/03/2015 या कालावधीत वेगवेगळया व्याख्यात्यांनी प्रशिक्षण दिल्याचे नमुद आहे. व्याख्यात्यांना दिलेल्या मानधनाबाबत पोच नसल्यामुळे व्याख्यानावर झालेला सदर खर्च रुपये 11,250/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) सदर प्रशिक्षण संपल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांना कार्यमुक्त केल्याबाबतचा प्रार्चाय, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही यांचा कार्यमुक्ती आदेश नस्तीला आढळुन आला नाही.

### 3.30 फॉगींग मशीनकरीता केमीकल्स खरेदी करणेमधील अनियमितता.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** जिल्हा निधी अंतर्गत ग्रामपंचायतीला फॉगींग मशीनकरीता केमिकल्स प्रती लिटर रुपये 2,177/- याप्रमाणे 683 लिटर खरेदीचे प्रदान बाहेती ब्रदर्स, नागपूर यांना रुपये 14,80,546/- एवढे शोधन करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा उघडणे दिनांक 13/11/2014 रोजी दुपारी 3.00 वाजता ठेवण्यात आली. लिफाफा क्रमांक 02, दिनांक 19/12/2014 रोजी दुपारी 12.00 उघडण्यात आला आहे.

2) लिफाफा क्रमांक 01 च्या अटी पुर्ण न करताच लिफाफा क्रमांक 02 मधील अटी व शर्तीप्रमाणे साहीत्याचे दर प्रती लिटर नमुद केलेले नाहीत. त्यामुळे प्राप्त केलेले साहीत्य बाजारपेठेपेक्षा जादा दराने खरेदी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) पंचायत समिती, चिमुर व पंचायत समिती, पोंभुर्णा यांचे मागणीपत्रावर अनुक्रमे 99 लिटर व 56 लिटरची मागणी आहे. परंतु त्यावर संवर्ग विकास अधिकारी यांची स्वाक्षरी व दिनांक नमुद नाही.

4) पंचायत समितीला साहीत्य कधी प्राप्त झाले त्याबाबतचे डिलीव्हरी चलान नस्तीला नाही.

5) पंचायत समिती, चंद्रपूरला साहीत्य प्राप्त झाल्याबाबत साठा नोंदवहीची झेरॉक्स जोडण्यात आलेली आहे. परंतु दिनांकामध्ये उपरीलेखन केलेले आहे. इतर पंचायत समितीची माहीती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे साहीत्य विहीत मुदतीत उपलब्ध झाल्याबाबत खात्री होत नाही.

6) देयकावर बॅच नंबर, उत्पादन तिथी व अंतिम दिनांक नमुद केलेला नाही. तसेच शासकीय प्रयोगशाळा यांचे टेस्टींग रिपोर्ट जोडण्यात आलेले नसतांना देयकाचे शोधन कुठल्या आधारे करण्यात आले, याबाबत सप्रमाण खात्री पटवावी.

7) ग्रामपंचायतीला पुरवठा केलेल्या ग्रामपंचायतीमध्ये फॉगींग मशीन उपलब्ध आहे काय? त्या चालु स्थितीत आहे काय ? यांची कुठलीही माहीती न घेता पुरवठा आदेश दिल्याचे सदर नस्तीवरुन दिसुन येते.

8) सदर साहीत्य पंचायत समिती स्तरावर पुरविण्यात आल्यामुळे ग्रामपंचातीला कधी देण्यात आले. तसेच त्याचा विनियोग केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षण कालावधीपर्यंत प्राप्त केल्याचे दिसुन येत नाही.

**3.31 दैनंदिनी छपाई खर्च रुपये 3,704/- जादा शोधनाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** दैनंदिनी छपाई प्रमाणक क्रमांक 1354, दिनांक 31/03/2015 नुसार 1,00,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. यामध्ये दैनंदिनी छपाई खर्च रुपये 3,704/- जादा शोधन केल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिपणी पान क्रमांक 32 व महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक दिनांक 26/01/2011 प्रमाणे लगतच्या जिल्हा परिषद अमरावती मुद्रणालयातुन दैनंदिनी छपाई आदेश क्रमांक 416/2015 दिनांक 23/01/2015 प्रमाणे 260 नग दैनंदिनी छपाईची मंजूरी असतांना 270 नग छपाई केल्याने 10 नग जादा छपाई करुन पुरवठा केल्याने रक्कम रुपये 3,704/- जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रुपये 3,704/- वसुलपात्र ठरते.

2) छपाई आदेशपेक्षा 10 नग जादा दैनंदिनी पुरवठा झाला असतांना साठा पुस्तकाची तपासणी केली असता प्राप्त दैनंदिनी 270 नग असतांना 275 नग केल्यामुळे अतिरिक्त 5 नग दैनंदिनी कशी काय वितरीत केल्याचे दर्शविण्यात आले आहे. अतिरिक्त 5 नग दैनंदिनी वितरणाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) बिल क्रमांक 091 दिनांक 12/03/2015 रुपये 1,00,000/- साठा पान क्रमांक 37 वर नोंद 270 नग 370.37 प्रती नग प्रमाणे असुन बिलावर परिपुर्ण माहिती नाही. एकुण रुपये व अक्षरी रुपये लाल शाहीने लिहिलेले आहे. तसेच बिलावरील माहिती अक्षरे व स्वाक्षरी यात तफावत असुन सदर बिल संशयीत असल्याचे लेखापरिक्षणास आढळुन आले.

**3.32 जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील बक्षिस वितरण उशिराने केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील बक्षिस वितरण यावर प्रमाणक क्रमांक 3403,दिनांक 31/03/2015 नुसार रुपये 12,80,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री शाहु, फुले, आंबेडकर दलित वस्ती विकास सुधारणा अभियानाअंतर्गत जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरावरील बक्षिस वितरणा करीता आलेला निधी महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दिनांक 06/06/2008 अन्वये सदर अखर्चित निधी लगतच्या आर्थिक वर्षात वर्ष अखेर पर्यंत खर्च करण्याची परवानगी असल्याने सन 2013-2014 मध्ये खर्च करणे आवश्यक असतांना केलेली नाही. व सन 2014-2015 मध्ये खर्च करणे करीता प्रादेशीक उपायुक्त समाज कल्याण नागपूर विभाग नागपूर यांची पुर्व परवानगी न घेता केलेला खर्च रक्कम रुपये 12,80,000/- हा नियमबाह्य ठरतो. तरी प्रादेशीक उपायुक्त समाज कल्याण नागपूर विभाग नागपूर यांची कार्योत्तर मंजूरी घेऊन दाखवावी अन्यथा संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुलीची कार्यवाही करावी.

2) जिल्हा परिषद गडचिरोली, पंचायत विभागाचे सन 2014-2015 या वर्षाचे लेखापरिक्षणास असे निदर्शनास आले की, सन 2011-2012 मध्ये दलित वस्ती विकास व सुधारणा अभियानाअंतर्गत जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर निवडुन आलेल्या ग्रामपंचायतींना बक्षिस वितरणाकरीता अनुदान प्राप्त असतांना विहीत कालावधीत खर्च केलेला नाही. त्यामुळे अखर्चित अनुदान शासनास परत करणे आवश्यक होते. शासन निर्णय प्र.क्र.बीजीटी-1099/743/99 दिनांक 13/08/1999 अन्वये अनुदान निर्धारणाची वाट न पाहता वर्षाअखेर किंवा दिलेल्या मुदतीत शिल्लक/ अखर्चित रक्कमा शासनसा परत करावयाची असतांना तसे न करता सन 2014-2015 मध्ये खर्च नमुद करणे ही नियमबाह्य असुन शासन निर्देशाचे पालन केलेले नाही.

3) प्राप्त अनुदान ग्रामपंचायतींना वितरीत करणे करीता धनादेश क्रमांक 169160, दिनांक 31/03/2015 रुपये 12,80,000/-चा डी.डी.तयार करणे करीता शाखा व्यावस्थापक दि.गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

शाखा संकुल गडचिरोली यांना जावक क्रमांक 1418, दिनांक 06/05/2015 ला पाठविण्यात आला असतांना बँकेने डी.डी. कधी तयार करून दिल्या व पुरस्कृत एकुण 24 ग्रामपंचायतींना कधी वितरीत करण्यात आला याबाबत नस्तीत पोच पावत्या उपलब्ध नसल्याने संबंधीत ग्रामपंचायतीला बक्षिसाची रक्कम प्राप्त झाली किंवा कसे याची तपासणी लेखापरिक्षणास करता आलेली नाही.

**3.33 वाहन क्रमांक एम.एच.33/सी-191 चे दुरूस्ती खर्च मर्यादेपेक्षा रूपये 16,870/- जादा केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** वाहन क्रमांक एम.एच.33/सी-191 चे दुरूस्तीखर्च मर्यादेपेक्षा रूपये 16,870/- जादा केला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन खर्चाची मर्यादा महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 11/01/2010 नुसार जिल्हा परिषद गडचिरोली कडील वाहनाची देखभाल व दुरूस्ती करीता खर्च मर्यादा पेट्रोल वाहनाकरीता रूपये 40,000/- प्रती वर्षा करीता असतांना सदर वाहनावर एकुण खर्च रूपये 56,870/- एवढा झालेला खर्च मर्यादेपेक्षा रक्कम रूपये 16,870/- ने जादा झालेला असुन जादा खर्च लेखामान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1099/प्र.क्र.135/05 दिनांक 31/08/1999 मधील मुद्दा क्रमांक 12 मध्ये निर्देशित केल्यानुसार वाहन क्रमांक एम.एच.33/सी-191 कार (पेट्रोल) या वाहनाच्या दुरूस्तीवर शासनाने ठरवून दिलेली वित्तिय मर्यादा रूपये 40,000/- एवढी असतांना रूपये 16,870/- चे जादा खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 109(1) दोन मधिल तरतुदी नुसार जादा होणाऱ्या खर्चास स्थायी समितीचे मंजुरी घेऊन विभागीय आयुक्त नागपुर विभाग नागपुर यांची मंजुरी घेणे आवश्यक असतांना ती घेतल्याचे लेखापरिक्षणास आढळुन आले नाही.

**3.34 जडसंग्रह नोंदवहीबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11)** - सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात जड संग्रह नोंदवहीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 98 (1) नुसार विभाग प्रमुख यांनी पडताळणीनंतर प्रत्येक वस्तुचे नोंदी समोर पडताळणी केल्याचे द्योतक म्हणुन अद्याक्षरी केलेली नाही. तसेच ज्या कारणासाठी साहित्य खरेदी करण्यात आली होती. त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 98 (3) नुसार जडसंग्रह खात्यातील साहित्याची खात्री केलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रमाणपत्र पाठविले नाही. नियम 98 (4) नुसार पिठासीन अधिकाऱ्याचे निवासस्थानी पुरविलेल्या फर्निचर साहित्याची पडताळणी करणे आवश्यक आहे. तशी पडताळणी करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 98 (5) नुसार पडताळणीची एक प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठविलेली नाही. तरी उक्त त्रुटींची पुर्तता करुन अनुपालन दर्शविणे आवश्यक आहे.

**3.35 मुद्रांक शुल्काची रक्कम / अनुदान ग्रामपंचायतीस वितरीत न केले बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड यांचेकडे सन 2014-2015 साठी मुद्रांक शुल्क रुपये 7,94,88,000/- इतके प्राप्त झाले, तसेच सन 2013-2014 चे शिल्लक अनुदान रुपये 3,15,40,500/- इतके होते, सदर अनुदानामधुन 50 टक्के अनुदान ग्रामपंचायतीस वितरीत करावयाचे आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 158 अन्वये जिल्हा परिषदांना एकुण प्राप्त अनुदान रुपये 7,94,88,000/- पैकी 50 टक्के अनुदान रुपये 3,97,44,000/- सन 2014-2015 मधील प्राप्त अनुदान व सन 2013-2014 मधील शिल्लक अनुदान रुपये 3,15,40,500/- असे एकुण रुपये 7,12,84,500/- इतकी रक्कम जिल्हयातील ग्रामपंचायतींना दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन संबंधित यादी प्राप्त करुन अनुदान वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु मुद्रांक शुल्क शिल्लक अनुदान जिल्हा परिषदेने वितरीत केलेले नाही. सदरची बाब नियमबाह्य आहे.

**3.36 ग्रामपंचायतीस जमीन महसुल वाढीव उपकर वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सामान्य प्रशासन विभाग/जिल्हा परिषद, बीड यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, बीड यांचेकडुन जमीन महसुल वाढीव उपकर अनुदान सन 2014-2015 मध्ये रुपये 4,91,60,413/- इतके प्राप्त झाले, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 155(6) 185,186 मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना जमीन महसुल वाढीव उपकर रुपये 4,91,60,413/- प्राप्त झालेला आहे. त्यापैकी 40 टक्के हिस्सा रुपये 1,96,64,166/- जिल्हा परिषद यांना व 60 टक्के हिस्सा रुपये 2,94,96,247/- ग्रामपंचायतीना वितरीत करणे आवश्यक आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एल.एस.सी.1092/सीआर/1963/24 दिनांक 22/04/1992 मधील तरतुदीनुसार व शासनाच्या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या सुचना व शर्तीचे पालन करुन सदरचे अनुदान दिनांक 31/03/2015 पुर्वी ग्रामपंचायतीस वितरीत करावयास पाहिजे, परंतु जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीस अनुदान वितरीत केलेले नाहीत. ही बाब नियमबाह्य आहे.

**3.37 जमीन महसुल, पंचायत समिती उपकर अनुदान ग्रामपंचायतींना वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड यांना जमीन महसुल पंचायत समिती उपकराची रक्कम रुपये 2,00,75,662/- इतकी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, कार्यालय बीड यांचे कडुन प्राप्त झाली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 144, 151, 152 व 155 तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 127, 131 मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना जमीन महसूल, जमीन महसूलावरील उपकर अनुदानाच्या रकमा वसुलीच्या आधारे जिल्हा परिषदेला सुपूर्त केलेल्या आहेत. जिल्हा परिषदेने अनुदानाचे वितरण करावे व मंजूर तरतुदीपेक्षा जास्त खर्च करु नये व खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून खर्चाचा अहवाल शासनास व आयुक्तास पाठवावा व खर्चाचे ताळमेळाचे काम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी करावे परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एलएफसी/1092/सीआर/ 1963/24 दिनांक 22/04/1992 मधील सुचनानुसार सन 2014-2015 चा वित्तीय वर्षात प्राप्त झालेले अनुदान रक्कम रुपये 2,00,75,662/- दिनांक 31/03/2015 पर्यंत ग्रामपंचायतीस वितरीत करावयास पाहिजे, परंतु जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीस अनुदान वितरीत केलेले नाही. ही बाब नियमबाह्य आहे.

**3.38 नविन वाहनांच्या खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी च्या सन 2014-15 च्या लेखापरीक्षणा दरम्यान वाहन खरेदी मध्ये पुढील प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या आहेत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जेईपी-1099/प्र.क्र.135/05, दिनांक 31/08/1999 प्रमाणे पूर्वीच्या वाहनांचे निर्लेखन केल्या नंतर वाहनाची खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु असे करण्यात आले नाही. तसेच विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक 2014/विशा/कक्ष-5/वाहन/सीआर-

9/419/14, दिनांक 14/03/2014 मधील अट क्रमांक 7 प्रमाणे बदली वाहन खरेदी केल्याच्या दिनांकापासून 3 महिन्याच्या आत निकाली काढावयाच्या वाहनांची नियमानुसार लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यात यावी असे स्पष्ट आदेश असताना अशी कार्यवाही केली नाही.

2) नवीन वाहन खरेदी बाबत नोंद कार्यालयाच इतिहास पुस्तीका / साठा नोंदवही मध्ये घेणे आवश्यक आहे परंतू अशा प्रकारची नोंद घेतल्याबाबत नोंदवही दर्शविण्यात आली नाही.

3) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक 2014/विशा/कक्ष-5/वाहन/सीआर-9/419/14, दिनांक 14/03/2014 मधील अट क्रमांक 4 प्रमाणे नवीन खरेदी करावयाचे वाहन जिल्हा परिषदेच्या घसारा निधीतून खरेदी करणे बाबत नमुद केले असताना असे करण्यात आले नाही.

4) उक्त आदेशातील अट क्रमांक 3 अन्वये जुनी वाहने व त्याबदली खरेदी करण्यात येणारी वाहने एकाच वेळी वापरात राहणार नाहीत याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्तीश: दक्षता घ्यावी असे नमुद केले असताना जूनी वाहने अदयाप पर्यंत निकाली काढले किंवा कसे याची सुयोग्य अभिलेख्यांअभावी तपासणी करता आली नाही.

## 3.39 पर्यावरण संतुलित समृध्द ग्रामयोजने संदर्भात एस.टी. बस स्थानकावर ऑडिओ (जिंगल्स) जाहीरात प्रसारीत करणेबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक व्हीपीएम-2012/प्र.क्र.157/परा-4,दिनांक 26/09/2012 नुसार पर्यावरण संतुलीत समृध्द ग्रामयोजने संदर्भात ग्रामीण भागात प्रसीध्दी माध्यमादवारे व्यापक प्रमाणात प्रचार प्रसिध्दी व जनजागृती करण्यासाठी या योजनेबाबत एस.टी. बस स्थानकावर 40 सेकंदाच्या ऑडीओ जाहीराती (जिंगल्स) प्रसारीत करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत रुपये 64,719/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पर्यावरण संतुलित समृध्द ग्रामयोजने संदर्भात ग्रामीण भागात प्रसिध्दी माध्यमादारे प्रचार व जनजागृती करण्यासाठी परभणी बसस्थानकावर दिनांक 27/09/2012 ते 26/11/2012 या कालावधीत, दररोज सकाळी 8 ते संध्याकाळी 8 वाजे पर्यंत, प्रत्येक तासाच्या 21 व्या मिनिटाला 40 सेकंदाची एक जिंगल याप्रमाणे ऑडीओ जिंगल्स प्रसारीत होत आहे किंवा कसे याबाबत जिल्हा परिषद अधिनस्त कर्मचारी/अधिकारी यांनी आठवडयातून दोन ते तीन वेळा अचानक भेट देउन योजनेची जाहीरात प्रसिध्द झाल्याची खात्री करुन प्रदान करणे आवश्यक असताना, अशी खात्री न करता एजन्सीला देयक प्रदान करण्यात आले आहे.

2) संबंधीत देयक हे सन 2012-13 या वित्तिय वर्षातील असताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 44 (1) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद परभणी यांचे मंजूरी आदेश घेणे बाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) संबंधीत एजन्सी प्रिती सोल्युशन्स लिमिटेड, पुणे यांना रुपये 64,719/- रक्कम प्राप्त झाल्याची पोहच पावती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

## 3.40 पर्यावरण संतुलित समृद्धी ग्राम योजना अंतर्गत सन 2012-2013 या वर्षात प्रथम, द्वितीय, तृतिय वर्षाच्या निधीसाठी पात्र असलेल्या 70 ग्रामपंचायतींना निधी वितरणाबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सामान्य प्रशासन विभागाने सन 2014-15 मध्ये नमुद प्रमाणकान्वये पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनेअंतर्गत ज्या ग्रामपंचायतींनी या योजनेमध्ये सहभाग घेतलेला आहे अशा ग्रामपंचायतींना रूपये 76,55,000/- लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वितरीत केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम./2610/प्र.क्र.1/पं.रा.4, दिनांक 18/08/2010 नुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे आदेश क्रमांक 99, दिनांक 31/03/2015 मधील अटी व शर्तीनुसार अट क्रमांक 01 ते 05 प्रमाणे विविध पर्यावरण संतुलीत विकासाच्या

दृष्टीने कामे हाती घ्यायची असुन या कामावर भर देवून लोकसहभागावर आधारीत सुक्ष्म नियोजन प्रक्रीयेव्दारे ग्रामविकास कृति आराखड्यात समाविष्ठ करुन या घटकाची अंमलबजावणी विविध योजनेच्या माध्यमातून करुन पर्यावरण संतुलित गाव विकसित करावयाचे असुन ग्रामविकास कृती आराखडा तयार करावयाचा असतो, परंतु विभागस्तरावर कोणत्याही ग्रामपंचायतीचा कृती आराखडा दिसुन आला नाही. कृती आराखड्याशिवाय वितरीत अनुदानाबाबत योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) वितरीत अनुदान ज्या कामासाठी वितरीत केले त्याच कामासाठी खर्च करावयाचा असताना त्याप्रमाणे कार्यवाही दिसुन आली नाही.

3) ग्रामपंचायतींचे उपयोगिता प्रमाणपत्र व पूर्णत्त्वाचा दाखला संचिकेत दिसुन आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/सीआर-1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा फलश्रुती अहवाल नाही.

### 3.41 अखर्चित निधी शासन खाती परत करणेबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात अखर्चित रक्कम शासनास परत न करता सदर रक्कम अद्यापही जिल्हा परिषदेच्या लेख्यात शिल्लक असल्याचे आढळुन आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2)(ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही त्यामुळे शासन अनुदान अखर्चीत राहिले आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चीत राहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. दिनांक 31 मार्च अखेर शिल्लक राहीलेला निधी शासनास परत करणे अपेक्षीत असताना पंचायत विभागाकडून याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अखर्चित रक्कम रुपये 7,13,96,297/- त्वरीत शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

### 3.42 आयकराची रक्कम कमी कपात केल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (जे) नुसार 10 टक्के आयकर कपात न करता 2 टक्के आयकर कपात करण्यात आलेला आहे. त्यामुळे रक्कम रुपये 40,50,137/- महाऑनलाईन मुंबई यांना जादा प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक तेविआ-2011/प्र.क्र.42/वित्त-4,दिनांक 17/04/2012 नुसार संस्थेने ग्रामपंचायतींस पुरविलेल्या ऑपरेटरच्या सेवेबद्दल 2 टक्के आयकर कपात केला आहे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (J) नुसार तांत्रिक सेवा पुरवठादाराकडून मुलतः 10 टक्के दराने आयकराची कपात करावयाची आहे. तसेच या कलमामधील तरतूदीमधे अशाप्रकारे सूट देण्यासाठी अपवाद नमूद केलेले नाही. असे असतानाही नियमबाह्य कमी कर कपात केलेली आहे. कमी कपातीची रक्कम रुपये 40,50,137/- वसूल करून आयकर खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.43 ई.पी.आर.आई प्रकल्पांतर्गत संगणक परिचालक (ग्रामपंचायत विभाग) यांचे मानधन कपात करताना आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (जे) ऐवजी 194 (सी) नुसार आयकराची कपात केल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, लातूर सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात असे दिसून आले की, उपरोक्त प्रमाणकान्वये महाऑनलाईन लिमिटेड मुंबई यांना ग्रामपंचायत स्तरावरील संगणक परिचालक यांचे मानधन रक्कम अदा करताना आयकर अधिनियम 1961 चे कलम [ जे ] नुसार 10 टक्के प्रमाणे आयकर रक्कम कपात करणे आवश्यक असताना 3 टक्के प्रमाणे रुपये 17,53,906/- कपात करण्यात आलेली आहे ज्यामुळे रक्कम रुपये 40,92,438/- महाऑनलाईन लिमिटेड, मुंबई ईत्यादी यांना जादा प्रदान झालेले आहे.

2) संगणक परिचालकाचे उपस्थिती हजेरीपट संचिकेत दिसुन आले नाही. त्यामुळे ज्यादा रकमांची प्रदान झाले नसल्याची खात्री पटवावी.